भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये | Rs. 100

रु. 100 | ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2024 ◑ 23AB 524832

अ.नं. 10417 रू.100/-पैकी रू 100/- दि.19/09/2024

नावः वॅक ऑफ बडोदा

पत्ताः सातपुर एमआयडीसी शाखा सातपुर नाशिक

हस्तेः अभिजीत पाटील

कारणः एक्स्ट्रा ॲमिनीटीज

योगेश वसंत शुक्ल
स्टॅम्प वेंडर नाशिक
परवाना क 7/2002

सही

TREASURY OFFICE NASIK
13 SEP 2024
STPHC ATO

FIVE RUPEES NOTARIAL

NOTARY
M. R. DHORE
AREA DIST. NASHIK
REGD No. 10520
Expiry Date 31/10/2028
GOVT. OF INDIA

NOTARY
NOTED & REGISTERED
Serial No. 0324
DATE 19/9/2024
This Document Contains
Total Pages

NOTARY
M. R. DHORE
AREA DIST.
NASHIK
REGD No. 10520
Expiry Date
31/10/2028
GOVT. OF INDIA

## जादा सुविधा करारनामा

आज दिनांक: १९ माहे सप्टेंबर इसवी सन २०२४ रोज गुरूवार ते दिवशी नाशिक मुक्कामी...

| | |
|---|---|
| १. श्री. ब्रजमोहन बालचन्द्र प्रजापति<br>वय: ३० वर्षे, धंदा:<br>पॅन: CHNPP 0635 E<br>आधार: 9782 9671 7451<br>२. सौ. पूनम प्रजापति<br>वय: २८ वर्षे, धंदा: गृहिणी<br>पॅन: DMKPP 9014 E<br>आधार: 5552 6779 6473<br>रा: रो-हाऊस नं. ७, स.नं. १००, जाधव संकुल, पवार फ्लोर मिल जवळ, चुंचाळे शिवार, सातपुर-अंबड लिंकरोड, नाशिक | लिहून घेणार |

यांसी...

| | |
|---|---|
| श्री. लालू मुनिलाल पंडीत<br>वय: ३२ वर्षे, धंदा: व्यापार<br>पॅन: BTKPP 3506 J<br>आधार: 8455 4576 1776<br>रा: ३, गजानन रो-हाऊस, महादेव मंदिर जवळ, विश्वास नगर, अशोक नगर, सातपुर, नाशिक | लिहुन देणार |

<u>कारणे जादा सुविधा करारनामा लिहून देतो ऐसा जे की,</u>

१) मिळकतीचे वर्णन: तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका नाशिक पैकी नाशिक महानगरपालिका, नाशिक हद्दीतील मौजे चुंचाळे शिवारातील सर्व्हे/गट/भुमापन नं. ६४/अ यांसी बिनशेती प्लॉट नं. ७२/२ यांसी एकुण क्षेत्र ९०.७५ चौ.मी. त्यापैकी नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचे रस्ता रुंदीकरणासाठी वजा झालेले क्षेत्र ४.५३ चौ.मी. वगळता उर्वरीत क्षेत्र ८६.२२ चौ.मी. यांसी बिनशेती आकार रु. ...... पैसे, या प्लॉट मिळकतीवर बांधलेली रो-हाऊस नं. १ मिळकत यांसी चटई क्षेत्र २६.१० चौ.मी. यांसी चतु:सिमा खालील प्रमाणे,

| | |
|---|---|
| पुर्वेस : | रो-हाऊस नं. २ |
| पश्चिमेस : | प्लॉट नं. ७२/१ |
| उत्तरेस : | प्लॉट नं. ७१ |
| दक्षिणेस : | ७.५ मी. कॉलनी रोड |

येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत त्यावरील जल, तरू, काष्ठपाषाण, निधिनिक्षेप, तदंगभुत वस्तुंसह, जाणे-येणेचे व वागवहिवाटीचे हक्कांसह इतर मिळकत धारकांबरोबर सामाईक सुविधा वापरांचे हक्कांसह दरोबस्त मिळकत.

२. लिहुन घेणार वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये ज्या सुखसुविधा पुरविणार आहेत त्या व्यतिरीक्त खालील प्रमाणे जादा सुखविधा पुरविण्याची लिहुन घेणार यांनी लिहुन देणार यांना विनंती केली, लिहुन देणार यांचा बांधकाम कॉन्ट्रेक्टरचा व्यवसाय असल्याने जादा सुखसुविधा पुरविणेकामी कच्च्या मालाची व लेबरची सोय असल्याने त्यांनी लिहुन घेणार यांची विनंती मान्य करून खालील तपशिलात नमुद केल्याप्रमाणे जादा सुविधा पुरविणेकामी सदरचा करार लिहुन व नोंदवुन दिलेला आहे.

३. सदर खालील तपशिलात नमुद जादा सुखसुविधा पुरविणेकामी लिहुन घेणार यांनी लिहुन देणार यांना **रक्कम रुपये ४,५०,०००/- (अक्षरी रु. चार लाख पन्नास हजार मात्र)** अदा करावयाचे आहेत, सदर रक्कम लिहुन घेणार यांना मान्य व कबुल असुन त्याबाबत उभयतांत वाद अगर तक्रार नाही. सदर **रक्कम रुपये ४,५०,०००/- (अक्षरी रु. चार लाख पन्नास हजार मात्र)** आजपासुन दोन महिन्याच्या मुदतीत लिहुन घेणार यांनी बँकेकडुन कर्ज करून अगर स्वत:च्या जबाबदारीवर अदा करावयाचे आहेत.

३. खालील प्रमाणे जादा सुखसुविधा लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना करुन दयावयाच्या आहे.

| अ. क्र. | तपशिल | एकुण |
|---|---|---|
| १ | डिझाइनींग दरवाजा वुडन फ्रेममध्ये मुख्य दरवाजा | २६०००/- |
| २ | सेफ्टी डोअर विथ फ्रेम | ४४०००/- |
| ३ | बाथरुम, टॉयलेट बेसीन व किचन फुल टाईल्स सिलींगपर्यंत | ६५०००/- |
| ४ | मागील बाजुस शेड, फ्रॅब्रिकेशन वर्क | ८५०००/- |
| ५ | किचन ट्रॉली | ५००००/- |
| ६ | वॉल सिलींग अंतर्गत पी.ओ.पी. डिझाईन व एल.ई.डी. सह (२ बेडरुम + किचन, हॉल सोडुन) | १८००००/- |
| | एकुण | रु. ४,५०,०००/- |

प्रस्तुत करारनामा नोंदणीकामी आलेला सर्व खर्च हा लिहुन यांनी केलेला आहे. या करारनाम्यात नमुद केलेल्या मिळकतीबाबत यापुर्वी जो करारनामा लिहुन ठेवला आहे, त्यास कोणत्याही प्रकारची बाधा न येता त्यास पुरक म्हणुन हा जादा सुविधा करारनामा करण्यात आलेला आहे.

येणेप्रमाणे हा जादा सुविधा करारनामा हा लिहून घेणार, लिहून देणार या उभयतांच्या संमतीने कोणाच्याही धाक दडपणांस बळी न पडता, पुर्ण शुध्दीत, त्यातील अटी व शर्ती समजावुन घेऊन लिहुन व नोंदवुन दिलेला आहे.

हा जादा सुविधा करारनामा

नाशिक

१. श्री. ब्रजमोहन बालचन्द्र प्रजापति ................. ब्रजमोहन प्रजापति

२. सौ. पूनम प्रजापति ................. Poonam Prajapati

(लिहून घेणार)

श्री. लालू मुनिलाल पंडीत ................. Lalupandit

(लिहून देणार)

साक्षिदारः

१. ................. २. .................

Parties are Identified by me

ATTESTED

MUKUND R. DHORE
Advocate & Notary Govt.of India
District Court Compound,Nasik-2

NOTARY
M. R. DHORE
AREA DIST. NASHIK
REGD.No.
Expiry Date 31/10/2028
GOVT. OF INDIA